# “ परभणी जिल्ह्यातील गंगाखेड आणि सोनपेठ तालुक्यातील लोकसंख्या वैशिष्ट्यांचा भौगोलिक अभ्यास ”

मानव्यविद्या शाखे अंतर्गत, भूगोल विषयातील पीएच.डी ( विद्यावाचस्पती ) या पदवी करिता

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

यांस सादर केल्या जाणाऱ्या शोध प्रबंधाचा आराखडा


संशोधक

**चव्हाण बालाजी गोविंद**

मार्गदर्शक

**प्रा. डॉ. दयानंद उजळंबे**

( एम. ए. , पीएच.डी )

**उप प्राचार्य तथा भूगोल विभाग प्रमुख**

**कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,**

**गंगाखेड जि. परभणी 431514.**

## “परभणी जिल्ह्यातील गंगाखेड आणि सोनपेठ तालुक्यातील लोकसंख्या वैशिष्ट्यांचा भौगोलिक अभ्यास”

**अ) प्रस्तावना :-**

भुगोल हा अतिप्राचीन विषय आहे. अगदी प्रारंभिक अवस्थेत भूगोल म्हणजे पृथ्वीचे वर्णन करणारे शास्त्र अशी व्याख्या केली गेली होती. पृथ्वीवर ज्या -ज्या गोष्टी मानवाला आढळल्या त्या सर्वांचे निरीक्षण करून मानवाने त्यांच्या नोंदी केल्या व तेथूनच भूगोलाची सुरुवात झाली.

लोकसंख्या ही मानवी समूहांची महत्वपूर्ण अभिव्यक्ती असून पृथ्वीवर अस्तित्वात असणाऱ्या विविध सांस्कृतिक दृश्यांचे प्रतीक आहे. लोकसंख्येची विविध अंगे भौगोलिक घटकांच्या प्रभावामुळे परिवर्तनशील होतात. उदा. उष्ण कटिबंधीय प्रदेशात उष्ण हवामानामुळे जन्मदराचे प्रमाण जास्त असते , तर शीत कटिबंधीय प्रदेशात मानवाच्या व्यवसायावर मर्यादा येतात. त्यामुळे इतर प्राण्याप्रमाणे मानवाला देखील सोयीनुसार स्थलांतर करावे लागते. पर्वतीय क्षेत्रात उंच-सखल भूमीमुळे वाहतुकीला मर्यादा येतात. त्यामुळे लोकसंख्या कमी असते. याउलट नद्यांच्या मैदानी प्रदेशात मात्र लोकसंख्या जात आढळते. यावरून भौगोलिक घटक व घटना यांचा लोकसंख्येचे वितरण, घनता, आकृतिबंध आकृतिबंध यांच्याशी निकटचा संबंध आहे हे सिद्ध होते. याच बरोबर शिक्षण , व्यवसाय, अर्थकारण, संस्कृती , राजकिय धोरण या अंगाचा लोकसंख्यावर महत्त्वपूर्ण प्रभाव असतो.

लोकसंख्या स्थल व कालसापेक्ष जसजशी वाढत जाते त्या-त्या प्रमाणात लोकसंख्येचा साधन संपत्ती वरील तानही वाढतो व दरडोई उत्पादन , राहणीमानाचा

दर्जा, दारिद्र्य, शिक्षण अशा विविध घटकावर प्रभाव पडतो. या समस्यांचे मूळ कारणे ओळखण्यासाठी व त्याचे नियमन करण्यासाठी लोकसंख्येचा भौगोलिक दृष्टिकोनातून केलेला अभ्यास उपयुक्त ठरतो. ऑर्थर गेडीज (१९४१), जेफर्सन, बेकट, औरुसी, जी. टी. त्रिवार्था (१९५३) यांनी लोकसंख्येवर केलेले संशोधनाचे काम अतिशय महत्त्वाचे आहे. त्रिवार्था यांनी तर क्षेत्रीय गुणधर्म प्रकट करण्यात मानवाचा मोठा वाटा आहे असे म्हटले. म्हणुन लोकसंख्येचा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरतो. यांनी लोकसंख्येच्या बाबतीत केलेले विधान महत्त्वपूर्ण आहे. Man is the determinant of character of area and he is area differentiating element. म्हणून लोकसंख्येचा अभ्यास भौगोलिक दृष्टिकोनातून होणे अत्यंत गरजेचे आहे.

परभणी जिल्ह्यातील गंगाखेड आणि सोनपेठ तालुके हे भौगोलिक दृष्ट्या वेगवेगळे आहेत. गंगाखेड तालुक्याचा काही भाग डोंगरळ आहे तर काही भाग समतल आहे तर सोनपेठ तालुक्याचा संपूर्णतः प्रदेश समतल आहे. या दोन्ही तालुक्यातील भौगोलिक भिन्नतेमुळे तेथील वस्तीवर , व्यवसायावर व तेथील लोकसंख्येच्या वैशिष्ट्यावर भौगोलिक घटकांचा स्थल व काल सापेक्ष परिणाम होतो. हे सिद्ध करण्यासाठी व त्या दोन्हिंचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी लहान भौगोलिक प्रदेश मी माझ्या संशोधनासाठी निवडलेला आहे. लोकसंख्या वाढ व त्याचे वितरण घनता व लोकसंख्या वाढीचा वेग व तिची गतिमानता, वयोगट, लिंगरचना, साक्षरता, ग्रामीण व शहरी लोकसंख्या यामध्ये झालेल्या बदलाचा अभ्यास प्रस्तुत संशोधनामध्ये करणार आहे.

**ब) अभ्यास क्षेत्र :-**

अभ्यासासाठी निवडली गेलेली गंगाखेड आणि सोनपेठ तालुक्याचे भौगोलिक स्थान हे महाराष्ट्र राज्यातील परभणी जिल्ह्याच्या अगदी दक्षिणेकडे आहे . गंगाखेड तालुक्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८ ° ४५' उत्तर ते १९ ° ०५' उत्तर अक्षांश आहे. तर रेखावृत्तीय विस्तार ७६ ° ३६' पुर्व ते ७६ ° ५२' पूर्व रेखावृत्त आहे. तालुक्याचे क्षेत्रफळ ६२५ चौ.कि.मी. एवढे आहे. गंगाखेड तालुक्या च्या दक्षिणेला लातूर जिल्ह्याची सीमा लागते. तर नैऋत्येला बीड जिल्ह्याची सीमा लागते. तर उत्तरेला परभणी तालुका , ईशान्येला पूर्णा तालुका, पूर्वेला पालम तालुका व पश्चिमेला सोनपेठ तालुक्याच्या सीमा लागतात. सोनपेठ तालुक्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८ °५२' उत्तर ते १९ ° ०६' उत्तर अक्षवृत्त आहे. तर रेखावृत्तीय विस्तार ७६° ४०' पूर्व व ते ते सुशांत ७६° ५२' पूर्व रेखावृत्त आहे.

सोनपेठ तालुक्याचे क्षेत्रफळ ३७८.७८ चौ.कि.मी. आहे. तालुक्यावच्या दक्षिणेला गंगाखेड तालुक्याची सीमा लागते , उत्तरेला मानवत व पाथरी तालुक्याची सीमा लागते. नैऋत्येला बीड जिल्ह्याची सीमा लागते. तर इशान्येला परभणी जिल्ह्याची सीमा लागते.

परभणी जिल्ह्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्रफळाच्या (६२१४ चौ.कि.मी.), गंगाखेड तालुक्याचे क्षेत्रफळ (६२५.२४ चौ.कि.मी.)१०.०६% एवढे आहे. तर सोनपेठ तालुक्याचे क्षेत्रफळ (३७८.७८ चौ.कि.मी.) ६.०७% एवढे आहे. २०११ च्या जनगणने नुसार जिल्ह्याची लोकसंख्या(१८ ,३६,०८६) पैकी गंगाखेड तालुक्याची लोकसंख्या (२,०२,८६७)११.०४% एवढी आहे. तर सोनपेठ तालुक्याची लोकसंख्या (७३ ,८१७) ४.०२% एवढी आहे.

**क) गृहितके :-**

१. लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांवर विविध घटकांचा परिणाम होतो

२. लोकसंख्येच्या रचनांमध्ये समानता आढळून येत नाही.

३. लोकसंख्येच्या वैशिष्ट्यामध्ये स्थल व काल सापेक्ष परिवर्तन होते.

**ड) संशोधनाची उद्दिष्टे :-**

१. गंगाखेड आणि सोनपेठ तालुक्यातील लोकसंख्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.

२. गंगाखेड आणि सोनपेठ या दोन तालुक्यातील लोकसंख्या वैशिष्ट्यांचा तुलनात्मक अभ्यास करणे

३. गंगाखेड आणि सोनपेठ तालुक्यातील भुमी उपयोजन आणि पीक प्रारुपचा आभ्यास करणे.

४. गंगाखेड आणि सोनपेठ तालुक्याचा निवडक गावातील लोकसंख्येच्या वैशिष्ट्यावर अभ्यास करणे.

५. लोकसंख्येचे वैशिष्ट्यांवर परिणाम करणाऱ्या संस्कृतीक प्राकृतीक, सामाजिक व आर्थिक घटकांचा कसा परिणाम झाला याचा अभ्यास करणे.

**ड) संशोधन पद्धती व माहिती स्त्रोत:-**

प्रस्तुत संशोधनात गंगाखेड आणि सोनपेठ तालुक्यातील लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करण्यासाठी विभीन्न अभ्यास पद्धतीचा अवलंब करण्यात येणार असून यामध्ये सांख्यिकीय पद्धती , गणितीय पद्धती तसेच वितरण दाखवण्या साठी

आलेख पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. भौगोलिक घटकाचा लोकसंख्येच्या वैशिष्ट्या वर कसा परिणाम होतो हे दाखवण्यासाठी GPS (ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीम) याचा वापर प्रस्तुत संशोधनात केला जणार आहे. लोकसंख्येच्या वैशिष्ट्या साठी विभिन्न सूत्राचा वापर करण्यात येणार आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व द्वितीय क्रमांकाच्या आकडेवारीचा वापर केला जाणार आहे. यामध्ये भारतीय जनगणना पुस्तिका , लोकसंख्येचा नोंदणी पुस्तके, शासकीय व खाजगी नोंदी , जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन , वेगवेगळया कार्यालयाने प्रकाशित केलेली सांख्यिकीय माहिती , कृषी पुस्तिका , गॅझेटियर या विषया संदर्भात संशोधन झालेले प्रबंध तसेच विभिन्न नियतकालिकेचा वापर प्रस्तुत संशोधनात होणार आहे.

**ई) प्रकरण रचना**

**प्रकरण पहिले** :- प्रस्तावना

**प्रकरण दुसरे** :- अभ्यास क्षेत्राची भौगोलिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी

**प्रकरण तिसरे** :- भूमी उपयोजन आणि पीक प्रारुप

**प्रकरण चौथे** :- लोकसंख्या वैशिष्ट्यांचा भौगोलिक अभ्यास

**प्रकरण पाचवे** :- लोकसंख्या वैशिष्ट्यांचा तुलनात्मक अभ्यास

**प्रकरण सहावे** :- क्षेत्र अभ्यास

**प्रकरण सातवे** :- निष्कर्ष समस्या व उपाय योजना

**संदर्भग्रंथ :-**


१. Dr. D.G.Ujalambe. An Analysis of population pressure & Land use pattern In Parbhani District : A geographical study.

२. Dr.Landge, S. S. Geographical Study of population nutritional density in Ambejogai Taluka. Beed (MH).

३. Hassan, M. .1Population Geography. jaipur: Rawat publication.

४. I, B. A. Principle of population Studies.

५. Kulkarni.S.N&Satish.shrivastav. Demography and population education. Vidhya publication Nagpur.

६. Nagarale, D. .(2011-2001) Geographical studay of changing population characteristics in Nashik Administrative Region.

७. R.C, C. .(1986) Geography of population. New Delhi : kalyani publishers.

८. आहीरराव .लोकसंख्य. पुणे.निराली :

९. कुमार, स .ग्रामीन विकास एंव क्षेत्रिय नियोजन. नई दिल्ली.अर्जुन पब्लिकेशन हाऊस :

१०. जाधव, अ .(२००८) .ह .यवतमाळ जिल्ह्यातील आरोग्य सुविधांचा भौगोलिक अभ्यास .

११. जाधव, र .(२०२०) .प .नांदेड जिल्ह्यातिल लोहा व कंधार तहसिलमधिल ग्रामिन लोक्संख्य व वस्तिचा तुल्नात्मक अभ्यास .

१२. बसंत, स .जनसंख्या भुगोल. नई दिल्ली :अर्जुन पब्लिकेशन हाऊस.

१३. district census handbook ( parbhani )

१४. Google Earth

१५. www.mapoindia.com


**संशोधक विध्यार्थी**
**चव्हाण बालाजी गोविंद**

**संशोधन मार्गदर्शक**
**प्रा. डॉ. दयानंद उजळंबे**